**पुणे महानगरपालिका (PMC)**
**प्रेस नोट / प्रसिद्धीपत्रक**

**दिनांक:** २६ सप्टेंबर २०२६
**स्थळ:** पुणे

# कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १४,४७७ गणेशमूर्तींचे पर्यावरण पूरक विसर्जन; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे:-** पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळ क्र. ०५ अंतर्गत कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने अनंत चतुर्दशीच्या दिवशी “पर्यावरणपूरक गणेश विसर्जन” मोहीम तसेच “स्वच्छता ही सेवा २०२६” मोहीम यशस्वीपणे राबवण्यात आली. महापालिका सहाय्यक आयुक्त, कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत भागात गणेशमूर्ती विसर्जन आणि संकलनासाठी एकूण **१८ ठिकाणी** चोख व्यवस्था करण्यात आली होती. या मोहिमेला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून, अनंत चतुर्दशीच्या दिवशी एकूण **१४,४७७ गणेशमूर्तींचे विसर्जन** करण्यात आले.

प्रशासनाने केलेल्या नियोजनानुसार विसर्जनाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

- **बांधीव हौद:** नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायाला प्राधान्य देत सर्वाधिक **९,९८५** गणेशमूर्तींचे बांधीव हौदात विसर्जन केले.
- **लोखंडी टाक्या:** महापालिकेने ठिकठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या लोखंडी टाक्यांमध्ये **३,९२८** मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.
- **मूर्ती संकलन:** पालिकेच्या संकलन केंद्रांवर एकूण **५६४** गणेशमूर्ती संकलित करण्यात आल्या.

सदर सर्व गणेश मूर्ती विसर्जन व संकलन केंद्र ठिकाणी मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन कार्यालय श्री. संतोष वारुळे, मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०५ श्री. माधव जगताप, मा. महापालिका सहाय्यक आयुक्त कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय श्री. तिमय्या जगले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ आरोग्य निरीक्षक श्री. राहुल राजगोळकर, आरोग्य निरीक्षक श्री. चंद्रवदन गायकवाड, श्री. नितीन साळुंके, श्री. शिवाजी गायकवाड, श्री. कृष्णा अवघडे, श्री. प्रमोद गायकवाड, श्री. संजय तेरेकर, श्री. विशाल पाटसकर, श्री. अमोल लांडगे, श्री. तौसीफ देशपांडे, श्री. संतोष गिते तसेच सर्व अभियंता वर्ग व सर्व मोकादम व सेवक यांनी नियोजनबद्ध व व्यवस्थितरित्या कामकाज पार पाडले.

या संपूर्ण गणेश मूर्ती विसर्जन काळात पुणेकर नागरिकांनी शिस्त पाळत आणि पर्यावरणाचे भान राखत महापालिकेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच विसर्जन घाटांवर व संकलन केंद्रांवर कार्यरत असलेल्या मनपा कर्मचाऱ्यांना (सेवक) नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले. याबद्दल कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने सर्व गणेशभक्तांचे व नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहे.

s/d
महापालिका सहाय्यक आयुक्त
कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका